# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत कार्यपत्रिका क्रमांक ३

**दिनांक : २३/५/२०१६** **वेळ : दुपारी १२.०० वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे मे ची मासिक सभा सोमवार दिनांक २३/५/२०१६ रोजी दु. १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा. पांढरकर निलेश शंकरराव – सभापती
२. मा. बाबर शारदा प्रकाश
३. मा. भारती फरांदे
४. मा. आर.एस.कुमार
५. मा. जावेद रमजान शेख
६. मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
७. मा. नंदा विकास ताकवणे
८. मा. तरस बाळासाहेब जयवंत
९. मा. भोंडवे मोरेश्वर महादू
१०. मा. प्रसाद शेट्टी
११. मा. झांबरे सतिश आनंदा (स्विकृत सदस्य)
१२. मा. गिरीष गोपाळ कुटे (स्विकृत सदस्य)

याशिवाय श्री. प्रशांत खांडकेकर - क्षेत्रीय अधिकारी, श्री. फारुक शेख - कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री. मिलींद कपिले- कार्यकारी अभियंता विद्युत, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री.सुनिल वाघुंडे, श्री.अनिल शिंदे , श्री. हनुमंत शिंदे , श्री. बन्सल एच.पी. ,इंगळे आर.एम., श्रीम बाबर एल.एस., श्री वैभव उसाळकर - उपअभियंता , श्री पी.जे. कदम - लेखाधिकारी , श्री.एम.एम.शिंदे - सहा. आरोग्याधिकारी, श्री. अनिल हरिश्चंद्रे - सहा.उद्यान निरीक्षक, श्री. डी.जी. कांबळे - उद्यान सहाय्यक, , श्री. माळी एस.के. - पशुवैद्यकिय आरोग्य निरिक्षक, श्री बाळासाहेब आढारी- ASI [ वाहतूक ] उपस्थित होते.

मा. सभापती यांनी उपस्थित सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

मा. सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक ९ : मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा दिनांक २३/५/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १६ गुरुदेव नगर येथे इंगळे बिल्डींगजवळ संडास ब्लॉक आहेत तेथे पाण्याची सोय नाही. पाणी कपातीमुळे महिला व पुरुषांची गैरसोय होते व त्याठिकाणी खूपच अस्वच्छता होत आहे. तरी सदर ठिकाणी पाण्याची सिटेंक्स टाकी बसविणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक १० : मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा दिनांक २३/५/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १६ मध्ये म्हाळसाकांत चौक ते खंडोबा मंदिर रस्ता आहे. हा रस्ता खूप रहदारीचा आहे. त्यामुळे वारंवार अपघात होतात. त्याकरीता सिध्देश्वर क्लासिकसमोर दोन्ही बाजूने स्पीड ब्रेकर बसविणेबाबत तसेच भालेराव हॉस्पिटल व सिध्देश्वर क्लासिक समोर झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे मारणे व लाईटचे पदपथ करणेबाबत विचार करणे.

विषयक क्रमांक ११ : मा. आर. एस. , सदस्य यांचा दिनांक २३/५/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्राधिकरण सेक्टर नंबर २५ येथील भगवान महावीर जैन मंदिर येथील व्यायामशाळा, रस्ता, ग्राऊंड, कोर्ट इ. चे नामकरणाबाबत विचार करणे

ठराव क्रमांक : ४ विषय क्रमांक : १

दिनांक : २३/५/२०१६ विभाग :

सूचक : मा. प्रसाद शेट्टी अनुमोदक : मा. भारती फरांदे

संदर्भ : मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ.सो. समोरील ६.०० मीटर रुंद रस्त्यास “हस्तीमल शेठ गादिया मार्ग” असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ५ विषय क्रमांक : २

दिनांक : २३/५/२०१६ विभाग :

सूचक : मा. आर एस कुमार अनुमोदक : मा.प्रतिभा भालेराव

संदर्भ : मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. ९/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

शुभारंभ कॉलनी, स.नं. (१३१/२ व १३०/१ मधील) यास शुभारंभ कॉलनी असा नामफलक बसवून मिळणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्रमांक : ६ विषय क्रमांक : ३

दिनांक : २३/५/२०१६ विभाग :

सूचक : मा. प्रतिभा भालेराव अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा. चारुशीला कुटे यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील नाना स्मृती मंगल कार्यालया मागील लक्ष्मी प्रोव्हीजन स्टोअर पासून ते चर्च पर्यंतच्या रस्त्याला " कै. गणपतराव ज्ञानदेव चव्हाण " तसेच उत्कर्ष क्लासेस ते सेंट्रल बँक या अंतर्गत रस्त्याला " कै. चंपालाल जैन मार्ग " तसेच विठ्ठल मंदिराच्या डाव्या बाजूने श्रीकृष्णनगर पर्यंत जाणा-या रस्त्यास " कै. संपत उमाजी माने मार्ग " व शंकर मंदिर ते कुटे वृंदावन सो. अंतर्गत असणा-या रस्त्याला " कै. बाळासाहेब रंगनाथ जाधव मार्ग " , आदर्श मित्र मंडळ समोरील रस्त्यास " कै. ह. भ. प. चांगदेव दादा काकडे " आणि विघ्नहर गणेश मंदिर ते दक्षिण मुखी मारुती मंदिर अंतर्गत रस्त्यास " कै. सुषमाताई विनायक जोशी मार्ग " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ७ विषय क्रमांक : ४

दिनांक : २३/५/२०१६ विभाग :

सूचक : मा. नंदा ताकवणे अनुमोदक : मा. राजू मिसाळ

संदर्भ : मा. नंदा विकास ताकवणे यांचा दिनांक १७/२/०१६ रोजीचा प्रस्ताव.

से. २८ मधील दोन चौकांचे नामकरण करणेबाबत.

से. २८ मधील संजय काळे ग्राऊंड शेजारील चौकाचे " एकता चौक " व से. २८ मधील मारुती मंदिर शेजारील आतील चौकाचे " आंबा चौक " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही सुरु करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक : ८ विषय क्रमांक : ५

दिनांक : २३/५/२०१६ विभाग :

सूचक : मा. प्रतिभा भालेराव अनुमोदक : मा. बाळासाहेब तरस

संदर्भ : मा. संगिताताई भोंडवे यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

रावेत बीआरटीएस रोडवरती श्री. बबन शं. शेटे यांच्या घरा समोरील नगरसेविका सौ. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांच्या नामफलकाशेजारील चौकास " कै. ज्ञानदेव केसू भोंडवे चौक " असे नाव देण्यात यावे. तसेच सोनटक्के वस्ती सर्व्हे १२/५ रावेत या ठिकाणी " यशवंत नगर , सोनटक्के वस्ती " असे नामकरण करणेत यावे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेची वेळी करणेत यावा.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ९ | विषय क्रमांक | : ६ |
| दिनांक | : २३/५/२०१६ | विभाग | : |
| सूचक | : मा. निलेश पांढरकर | अनुमोदक | : मा. बाळासाहेब तरस |

संदर्भ : मा. अध्यक्ष निलेश पांढरकर यांचा यांचा दिनांक १९/५/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 16 आकुर्डी गावठाण मधील सुभाष पांढरकर नगर येथील बीना इंग्लिश मिडीयम स्कुल समोर एक मुतारी आहे तसेच शाळेच्या शेजारी सुध्दा स्वच्छतागृह व मुतारी असल्यामुळे शाळेसमोरील मुतारीची आवश्यकता नाही. त्यामुळे सदरची मुतारी काढल्यास शाळेसमोरचा परिसर स्वच्छ राहील. तरी सदर शाळेसमोरील मुतारी काढणेबाबत विचार करणे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १० | विषय क्रमांक | : ७ |
| दिनांक | : २३/५/२०१६ | विभाग | : स्थापत्य |
| सूचक | : मा. निलेश पांढरकर | अनुमोदक | : मा. बाळासाहेब तरस |

संदर्भ : मा. अध्यक्ष निलेश पांढरकर यांचा यांचा दिनांक १९/५/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 16 आकुर्डी गावठाण मधील सुभाष पांढरकर नगर येथील बीना इंग्लिश मिडीयम स्कुल समोर मोकळया जागेत, परिसरात राहणारे रहिवासी तिथे त्यांच्या मुलांना शौचास बसवित असल्याने तो परिसर दुर्गंधित होतो. परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी त्या जागेवर एक वाचनालय सुरु केल्यास त्या भागातील नागरिक विशेषत: ज्येष्ठ नागरिकांसाठी सोयीचे होईल. तरी सदर शाळेसमोरच्या मोकळया जागेत एक वाचनालय सुरु करणेबाबत विचार करणे .

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ११ | विषय क्रमांक | : ८ |
| दिनांक | : २३/५/२०१६ | विभाग | : स्थापत्य |
| सूचक | : मा. निलेश पांढरकर | अनुमोदक | : मा. बाळासाहेब तरस |

संदर्भ : मा. अध्यक्ष निलेश पांढरकर यांचा यांचा दिनांक १९/५/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 16 आकुर्डी गावठाण मधील जिजानगर परिसरात 4 शीटचे फायबर शौचालय आहे. तेथील जागा मालकांनी सदर शौचालय काढणेकामी विनंती केली आहे. त्यामुळे त्याठिकाणचे 4 शीटचे फायबर शौचालय काढणे आवश्यक असल्याने त्याबाबत विचार करणे .

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : १२ विषय क्रमांक : ९
दिनांक : २३/५/२०१६ विभाग : स्थापत्य
सूचक : मा. प्रतिभा भालेराव अनुमोदक : मा. निलेश पांढरकर

संदर्भ : मा. प्रतिभा भालेराव यांचा यांचा दिनांक २३/५/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १६ गुरुदेव नगर येथे इंगळे बिल्डींगजवळ संडास ब्लॉक आहेत तेथे पाण्याची सोय नाही. पाणी कपातीमुळे [ दिवसाआड ] महिला व पुरुषांची गैरसोय होते व त्याठिकाणी खूपच अस्वच्छता होत आहे. तरी सदर ठिकाणी पाण्याची सिटेंक्स टाकी बसविणेबाबत विचार करणे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : १३ विषय क्रमांक : १०
दिनांक : २३/५/२०१६ विभाग : स्थापत्य
सूचक : मा. प्रतिभा भालेराव अनुमोदक : मा. निलेश पांढरकर

संदर्भ : मा. प्रतिभा भालेराव यांचा यांचा दिनांक २३/५/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १६ मध्ये म्हाळसाकांत चौक ते खंडोबा मंदिर रस्ता आहे. हा रस्ता खूप रहदारीचा आहे. त्यामुळे वारंवार अपघात होतात. त्याकरीता सिध्देश्वर क्लासिकसमोर दोन्ही बाजूने स्पीड ब्रेकर बसविणेबाबत तसेच भालेराव हॉस्पिटल व सिध्देश्वर क्लासिक समोर झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे मारणे व लाईटचे पदपथ करणेबाबत विचार करणे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : १४ विषय क्रमांक : ११
दिनांक : २३/५/२०१६ विभाग : स्थापत्य
सूचक : मा. आर एस कुमार अनुमोदक : मा. भारती फरांदे

संदर्भ : मा. आर.एस. कुमार यांचा यांचा दिनांक २३/५/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्राधिकरण येथील सेक्टर नं. २५ येथे श्री १००८ भगवान महावीर जैन मंदिर पुर्वीपासून आहे. तेथे एक व्यायामशाळा व अलिकडेच चालू झालेले टेनिस कोर्ट ही आहे.

१६ जुलै १९९२ रोजी भगवान महावीर अहिंसा ट्रस्टने वृक्षारोपणाचा कार्यक्रम त्यावेळचे नगरसेवक मा. आर. एस. कुमार, मा. सौ. गिताताई आफळे आणि मा. सौ.मंगलाताई कदम यांचे उपस्थितीमध्ये घेतला होता. त्यावेळी व्यायामशाळेला बाहुबली व्यायामशाळा तेथून जाणा-या रस्त्याला भगवान महावीर पथ व संपुर्ण ग्राऊंडला भगवान महावीर पार्क असे नामकरण करण्याचे ठरले व तसे जाहीर केले व त्यानंतर तसा ठराव ही महानगरपालिकेमध्ये झाला आहे. त्यानंतर जुलै २०१० मध्ये टेनिस कोर्टला चक्रवती भरत टेनिस कोर्ट अशा नामकरणाचा ठराव ही झाला आहे.

सध्या कमान उभारणीचे काम चालू आहे. त्यावर चक्रवर्ती भरत टेनिस कोर्ट, बाहुबली व्यायामशाळा व भगवान महावीर पार्क असा नामोल्लेख करणेबाबत विचार करणे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे अ प्रभाग समितीच्या मासिक सभेचे कामकाज होऊन मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
( निलेश शंकरराव पांढरकर )
सभापती
अ प्रभाग समिती

क्र. अक्षेका /११/कावि/ २३९ /२०१६
दिनांक : १० /६/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती